शुक्रवार दि. २५ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक २५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# दुष्काळी संकटात शेतकऱ्यांच्या पाठीशी

## आमदार नारायण कुचे यांनी अधिकाऱ्यांसमवेत दुष्काळी भागाची पाहणी केली

**बदनापूर - प्रतिनिधी**

तालुक्यात पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आमदार श्री. नारायण कुचे यांनी वरुडी, कडेगाव, बाजार गेवराई, गोकुळवाडी आणि मान देऊळगाव येथील शेतशिवारांना भेट देऊन पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी तहसीलदार श्री. शंकर हंदेश्वर, तालुका कृषी अधिकारी श्री. गोपाल गुजर यांच्यासह संबंधित शासकीय अधिकारी उपस्थित होते.

पावसाची कमतरता आणि प्रतिकूल हवामानामुळे पिकांवर झालेला परिणाम यावेळी आमदार कुचे यांनी प्रत्यक्ष पाहिला. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी, पिकांचे नुकसान, पाण्याची उपलब्धता तसेच आगामी काळातील संभाव्य परिस्थितीबाबत माहिती जाणून घेतली.

यावेळी कृषी अधिकाऱ्यांकडून विविध पिकांची सद्यस्थिती, नुकसानीची शक्यता, बाधित क्षेत्र आणि आवश्यक उपाययोजनांबाबत आमदार कुचे यांनी सविस्तर माहिती घेतली. तसेच परिस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून शेतकऱ्यांना आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी प्रशासनाने तत्परतेने कार्यवाही करण्याबाबत चर्चा करण्यात आली.



**शेतकऱ्यांच्या समस्या शासनदरबारी मांडणार**

दुष्काळामुळे शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेल्या विविध प्रश्नांबाबत आमदार कुचे यांनी शेतकऱ्यांकडून थेट माहिती घेतली. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी जाणून घेणे, त्यांच्या प्रश्नांना योग्य व्यासपीठावर मांडणे आणि आवश्यक मदतीसाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणे सुरूच राहील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

राज्याच्या विविध भागांतील दुष्काळसदृश परिस्थितीचा शासनाकडून आढावा घेतला जात असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रभावित शेतकऱ्यांना मदतीची भूमिका जाहीर केली आहे. दुष्काळी परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी राज्यस्तरावरही उपाययोजना सुरू असल्याचे अलीकडील (पान २ वर)

# खेळांमुळे व्यक्तिमत्त्वाला शिस्त आणि कणखरता लाभते-डॉ. सुदामराव गवारे

## जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेचे क्रीडा संकुलात उत्साहात उद्घाटन; ७० हून अधिक खेळाडूंचा सहभाग

**जालना - प्रतिनिधी**

खेळ केवळ शारीरिक तंदुरुस्तीपुरते मर्यादित नसून ते विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा आणि आत्मिक बळ देतात. तायक्वांदोसारख्या मार्शल आर्ट्समुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, स्वसंरक्षणाची क्षमता आणि कठोर शिस्त निर्माण होते, असे प्रतिपादन जिल्हा स्त्री रुग्णालयाचे



अधीक्षक डॉ. सुदामराव गवारे यांनी केले.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना व तायक्वांदो असोसिएशन ऑफ जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेचे उद्घाटन आज, गुरुवार दि. २४ सप्टेंबर रोजी जिल्हा क्रीडा संकुलाच्या सभागृहात डॉ. सुदामराव गवारे यांच्या हस्ते पार पडले. त्याप्रसंगी ते बोलत होते. या उद्घाटन सोहळ्याच्या (पान २ वर)

# १४ वर्षांखालील मुलांची जिल्हा क्रिकेट संघ निवड चाचणी २७ सप्टेंबरला

## महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय निमंत्रितांच्या स्पर्धेसाठी जालना जिल्हा संघाची निवड

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आगामी राज्यस्तरीय निमंत्रितांच्या स्पर्धांसाठी जालना जिल्ह्याचा १४ वर्षांखालील मुलांचा क्रिकेट संघ निवडण्यासाठी जिल्हा क्रिकेट असोसिएशन, जालना यांच्या वतीने रविवार, २७ सप्टेंबर २०२६ रोजी निवड चाचणी घेण्यात येणार आहे. जालना जिल्ह्यातील उदयोन्मुख क्रिकेटपटूंना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार असल्याने या निवड चाचणीकडे युवा क्रिकेटपटूंचे लक्ष लागले आहे. ही निवड चाचणी पोखरी, जि. जालना येथील जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यातील पात्र व इच्छुक खेळाडूंनी निर्धारित वेळेत मैदानावर उपस्थित राहून निवड चाचणीत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे.

या निवड चाचणीसाठी १ सप्टेंबर २०१२ नंतर जन्मलेल्या मुलांना सहभागी होता येणार आहे. पात्र खेळाडूंनी आपली जन्मतारीख सिद्ध करणारी आवश्यक कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक आहे.

निवड प्रक्रियेदरम्यान खेळाडूंच्या कागदपत्रांची पडताळणी केली जाणार असल्याने कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये, यासाठी संबंधित कागदपत्रांच्या सत्यप्रती सोबत आणाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

निवड चाचणीसाठी उपस्थित राहणाऱ्या खेळाडूंनी जन्म प्रमाणपत्र, आधार कार्ड, शाळेचा टी.सी., दहावीची सनद इत्यादी आवश्यक कागदपत्रांच्या सत्यप्रती सोबत आणाव्यात. कागदपत्रांच्या पूर्ततेबाबत खेळाडूंनी विशेष काळजी घ्यावी, असेही आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

निवड चाचणीसाठी येणाऱ्या सर्व खेळाडूंनी पूर्ण क्रिकेट पोशाखात आणि स्वतःचे क्रिकेट साहित्य घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. निवड चाचणीमध्ये सहभागी होण्यासाठी खेळाडूंनी रविवारी सकाळी १० (पान २ वर)

# मराठवाड्यातील दुष्काळावर तातडीच्या मदतीची मागणी

## विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांची भेट घेऊन दुष्काळी परिस्थितीवर राष्ट्रवादीची चर्चा

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करून शेतकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नांबाबत शासनाने तातडीने मदत व उपाययोजना कराव्यात, या मागणीसाठी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांची भेट घेऊन



सविस्तर चर्चा करण्यात आली. संपूर्ण खरीप हंगाम मोठ्या प्रमाणात बाधित झाला असून अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची परिस्थितीही गंभीर बनल्याचा दावा यावेळी करण्यात आला. मराठवाड्यातील विविध भागांत पाहणी करून शेकडो शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पिकांची झालेली हानी, पावसातील खंड आणि आर्थिक अडचणींची माहिती दिल्याचे सांगण्यात आले. या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्तांकडे शासनामार्फत तातडीने मदत व आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. काही भागात नुकताच परतीचा काही प्रमाणात पाऊस झाल्याने (पान २ वर)

# मराठवाडा संघटन आढावा दौरा: जालना जिल्ह्यात शिवसेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

शिवसेना मुख्यनेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथराव शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार आणि शिवसेना संसदीय गटनेते खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या सूचनेनुसार राज्यभरात ''मराठवाडा संघटन आढावा दौरा'' सुरू आहे. या दौऱ्यांतर्गत आज जालना येथे शिवसेना सचिव भाऊसाहेबजी चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली.

या बैठकीत जालना, बदनापूर, भोकरदन, परतूर आणि घनसावंगी या पाचही विधानसभा मतदारसंघांतील




संघटनेच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या प्रसंगी पक्षातील प्रलंबित प्रश्न, प्रलंबित संघटनात्मक नेमणुका, पदाधिकाऱ्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन तसेच संघटन वाढवताना येणाऱ्या विविध अडचणींवर सविस्तर चर्चा झाली. आगामी काळात शिवसेना पक्षाचा जिल्ह्यात अधिक मजबुतीने विस्तार करण्यासाठी आवश्यक असलेल्या नियोजनाची रूपरेषा या वेळी ठरवण्यात आली.

''संघटना मजबूत करण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी थेट संवाद, सातत्यपूर्ण आढावा आणि प्रभावी नियोजन हाच शिवसेना संघटनबांधणीचा मुख्य संकल्प आहे,'' असे प्रतिपादन या वेळी नेत्यांनी केले.

**प्रमुख नेत्यांची व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती**

या बैठकीस शिवसेना उपनेते तथा माजी मंत्री आमदार अर्जुनराव खोतकर, संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर, पंडितराव भुतेकर, युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे, जिल्हासंघटक ॲड. भास्कर मगरे, शिवसेना शहर प्रमुख विष्णु पाचफुले (पान २ वर)

# बकरी चोरीच्या टोळीचा पर्दाफाश; एक जेरबंद, १८ गुन्हे उघड

## चोरीसाठी वापरलेली स्विफ्ट कार व साहित्य जप्त; जालना जिल्ह्यासह विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील गुन्ह्यांची उकल

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात विविध ठिकाणी बकऱ्यांची चोरी करून शेतकरी व पशुपालकांना आर्थिक फटका देणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. बकरी चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका संशयित आरोपीला ताब्यात घेतले. पोलिसांच्या चौकशीत त्याने साथीदाराच्या मदतीने विविध ठिकाणी बकरी चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईत चोरीसाठी वापरण्यात



आलेली स्विफ्ट कार व चोरीचे साहित्य असा एकूण ४ लाख १ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परतूर, बदनापूर, अंबड, चंदनझिरा, मौजपुरी, मंठा, सदर बाजार, जालना तालुका, तीर्थपुरी आणि पारध आदी पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील बकरी चोरीचे एकूण १८ गुन्हे उघडकीस आल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

जालना जिल्ह्यात जनावर चोरीचे गुन्हे करणाऱ्या आरोपींचा शोध घेऊन प्रलंबित गुन्ह्यांची उकल करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बकरी चोरी करणाऱ्या संशयितांची माहिती संकलित करून त्यांचा शोध सुरू केला. दरम्यान, २३ सप्टेंबर २०२६ रोजी पोलिसांना माहिती मिळाली की, परतूर येथील आठ बकऱ्यांची चोरी सिरसगाव मंडप, ता. भोकरदन येथील रईस सरदार शहा (वय २०) याने आपल्या साथीदाराच्या मदतीने केली आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी हसनाबाद परिसरात शोधमोहीम राबवून रईस शहा याला ताब्यात घेतले. सुरुवातीला त्याने पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे दिल्याचे सांगण्यात आले. मात्र, त्यानंतर विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने परतूर येथून साथीदाराच्या मदतीने बकऱ्या चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. (पान २ वर)

# शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन काँग्रेसकडून दुष्काळी परिस्थितीची पाहणी

### मागण्या मान्य न झाल्यास ५ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल - खा. डॉ कल्याणराव काळे

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्हा काँग्रेस व तालुका काँग्रेसच्या वतीने जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करण्यात आली. जालना जिल्ह्याचे खासदार डॉ. कल्याणराव काळे, जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे, बदर भाई, परतूर तालुकाध्यक्ष बालासाहेब आकात, अविनाश चव्हाण यांच्यासह काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील मंठा, परतूर येथील विविध भागांतील खरीप पिकांची शिवार पाहणी करून



शेतकऱ्यांशी संवाद साधला.

यावेळी तहसीलदार, कृषी सहाय्यक अधिकारी तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते. पावसातील मोठ्या खंडामुळे खरीप पिकांची झालेली दयनीय अवस्था आणि शेतकऱ्यांचे नुकसान पाहून खासदार डॉ. कल्याणराव काळे यांनी शेतकऱ्यांसह परतूर येथील उपविभागीय कार्यालयात जाऊन प्रशासनाच्या निदर्शनास परिस्थिती आणून दिली. यावेळी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनाला सादर (पान २ वर)

# संपादकीय...

## मराठा समाजाला संघर्ष नव्हे, स्पष्टता हवी

मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा आंदोलनाच्या केंद्रस्थानी आला आहे. एका बाजूला मनोज जरांगे पाटील यांची आक्रमक आंदोलनाची भूमिका, तर दुसऱ्या बाजूला सत्ताधारी शिवसेनेचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिलेला इशारा या संघर्षामुळे मूळ प्रश्नापेक्षा व्यक्तिगत शाब्दिक संघर्षच अधिक ठळक होताना दिसत आहे. खोतकरांनी ''व्यक्तिगत टीका नको, समाजाच्या प्रश्नांवर विधायक भूमिका घ्या'' असे आवाहन करताना, वरिष्ठ नेत्यांवरील टीका सुरू राहिल्यास ''शिवसेना स्टाईलने उत्तर'' देण्याचा इशारा दिला आहे. दुसरीकडे, जरांगे पाटील यांनी आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारमधील नेत्यांवर कठोर टीका केली आहे. त्यामुळे सध्या संघर्ष केवळ आरक्षणाच्या मागण्यांपुरता राहिलेला नाही; तो राजकीय नेतृत्वाच्या भूमिकांभोवतीही फिरताना दिसत आहे. पण येथे एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतोमराठा समाजाला नेत्यांच्या मिशांचा संघर्ष हवा आहे की आरक्षणाच्या प्रश्नावर ठोस निर्णय? हा प्रश्न कोणत्याही एका व्यक्तीचा नाही. तो लाखो कुटुंबांच्या शिक्षण, रोजगार आणि सामाजिक-आर्थिक भवितव्याशी संबंधित आहे. त्यामुळे आंदोलनाचे नेतृत्व असो किंवा सत्तेत असलेले नेतृत्वदोन्हींकडून जबाबदार संवादाची अपेक्षा स्वाभाविक आहे. खोतकरांनी आपल्या पत्रकार परिषदेत एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळातील शिंदे समिती, आरक्षण आणि कुणबी नोंदींच्या प्रक्रियेचा उल्लेख केला. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या संकेतस्थळावरही जिल्हानिहाय कुणबी-मराठा दस्तऐवज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मात्र या सगळ्या प्रक्रियेकडे पाहताना एक गोष्ट स्पष्ट असली पाहिजेशासनाने केलेल्या प्रक्रियेचे श्रेय कोणाला मिळाले, यापेक्षा पात्र लाभार्थ्याला प्रत्यक्ष काय मिळाले, हा खरा प्रश्न आहे. आरक्षणाचा प्रश्न कायदेशीर, प्रशासकीय आणि सामाजिक अशा तिन्ही पातळ्यांवर गुंतागुंतीचा आहे. कुणबी नोंदी, प्रमाणपत्रे, जात पडताळणी, आरक्षणाची घटनात्मक चौकट आणि न्यायालयीन कसोटी या सर्वांचा विचार करावा लागतो. त्यामुळे कोणत्याही घोषणेला अंतिम समाधान समजण्यापेक्षा त्याची अंमलबजावणी आणि कायदेशीर टिकाव महत्त्वाचा आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न राज्याच्या राजकीय अजेंड्यावर सातत्याने राहिला आहे. त्यांच्या मागण्यांमध्ये कुणबी नोंदी आणि त्यावर आधारित प्रमाणपत्रांचा मुद्दा प्रमुख राहिला आहे. ऑगस्टमध्ये सुरू झालेल्या त्यांच्या आंदोलनाच्या काळातही त्यांनी सरकारच्या भूमिकेवर तीव्र टीका केली होती. आंदोलनकर्त्याला सरकारला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. त्याचवेळी सत्तेतील नेत्यांनाही आपली बाजू मांडण्याचा अधिकार आहे. पण दोन्ही बाजूंच्या भाषेने प्रश्न सुटत नसतील, तर त्या भाषेचा उपयोग काय?

आंदोलनाची ताकद केवळ गर्दीत नसते; ती मागण्यांच्या स्पष्टतेत असते. आणि सत्तेची ताकद केवळ संख्याबळात नसते; ती प्रश्न सोडवण्याच्या क्षमतेत असते.

''आमचा संयम ही दुर्बलता समजू नका'' किंवा ''शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ'' अशा राजकीय इशाऱ्यांनी समर्थकांमध्ये उत्साह निर्माण होऊ शकतो; पण सामाजिक प्रश्नांवर त्यातून तोडगा निघत नाही. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर महाराष्ट्रात आधीच मोठ्या प्रमाणावर आंदोलने, उपोषणे आणि राजकीय संघर्ष झाले आहेत. अशा पार्श्वभूमीवर राजकीय नेत्यांनी भाषेची उंची वाढवण्याची गरज आहे; संघर्षाची तीव्रता वाढवण्याची नाही. कारण एका नेत्यावरील टीकेला दुसऱ्या नेत्याचा प्रतिआक्रमक प्रतिसाद मिळत राहिला, तर चर्चेचा केंद्रबिंदू आरक्षण आरोप प्रत्यारोप व्यक्तिगत संघर्ष असा बदलत जाईल. आणि शेवटी ज्यांच्यासाठी आंदोलन सुरू आहे, तो सामान्य मराठा युवक पुन्हा त्याच प्रश्नासमोर उभा राहील. सरकारने आतापर्यंत झालेल्या प्रक्रियेचा तपशील जनतेसमोर पारदर्शकपणे ठेवण्याची गरज आहे.

किती नोंदी सापडल्या?किती पात्र व्यक्तींना प्रमाणपत्रे मिळाली? किती अर्ज प्रलंबित आहेत? प्रमाणपत्रांच्या प्रक्रियेत अडथळे कुठे आहेत? आरक्षणाचा लाभ शिक्षण आणि रोजगारात प्रत्यक्ष किती लोकांना मिळाला?

आणि उर्वरित मागण्यांबाबत सरकारची पुढील कायदेशीर व प्रशासकीय दिशा काय आहे? या प्रश्नांची आकडेवारीसह उत्तरे मिळाली, तर श्रेयाच्या राजकारणाला आपोआप मर्यादा येईल. ज्याप्रमाणे सत्ताधाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांना केवळ राजकीय दबाव म्हणून न पाहता त्यातील सामाजिक प्रश्न समजून घेतले पाहिजेत, त्याचप्रमाणे आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्यांनीही व्यक्तिगत टीका आणि सामाजिक मागणी यातील सीमारेषा स्पष्ट ठेवली पाहिजे. नेत्यांवर प्रश्न विचारणे हा लोकशाहीचा भाग आहे. पण व्यक्तीला लक्ष्य करून संघर्ष तीव्र करण्यापेक्षा धोरण, निर्णय, शासनादेश आणि अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित करणे अधिक परिणामकारक ठरते. आज मराठा समाजासमोर रोजगाराचा प्रश्न आहे. शिक्षणाचा प्रश्न आहे. शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक अडचणी आहेत. स्पर्धा परीक्षांमध्ये वाढती स्पर्धा आहे. आरक्षण हा त्यातील महत्त्वाचा भाग आहे; परंतु तो संपूर्ण सामाजिक प्रश्नाचा एकमेव पैलू नाही. म्हणूनच समाजाच्या प्रश्नांवर राजकीय पक्ष, आंदोलनाचे नेतृत्व आणि सरकारया सर्वांनी एकमेकांना शत्रू मानण्याऐवजी आपापली भूमिका स्पष्टपणे जनतेसमोर ठेवणे आवश्यक आहे. जरांगे पाटील यांनी सरकारला प्रश्न विचारावेत; सरकारने त्या प्रश्नांना तथ्यांसह उत्तर द्यावे. खोतकरांनी आपल्या सरकारची भूमिका मांडावी; पण त्याच वेळी आंदोलनकर्त्यांच्या प्रश्नांनाही गांभीर्याने उत्तर द्यावे.

**हीच लोकशाहीची खरी परीक्षा आहे.**

शेवटी... मिशांवर ताव देण्याने आरक्षण मिळत नाही. इशारे देण्याने आरक्षणाचा प्रश्न सुटत नाही. आरोप-प्रत्यारोपांनी युवकाला नोकरी मिळत नाही.

आणि श्रेयाच्या लढाईने समाजाचा प्रश्न संपत नाही. मराठा आरक्षणाचा लढा आता भावनिक घोषणांपासून तथ्य, कायदा, प्रशासन आणि अंमलबजावणीच्या टेबलावर नेण्याची गरज आहे.

पान १ व ४ वरुन...

### दुष्काळी संकटात...

सरकारी घोषणांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

**''शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही''**

''शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही,'' अशी भूमिका व्यक्त करत आमदार नारायण कुचे यांनी दुष्काळी परिस्थितीत बळीराजाला आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्याचे सांगितले. पिकांच्या नुकसानीचे योग्य मूल्यांकन, आवश्यक पंचनामे आणि शासनाच्या निकषांनुसार मदत मिळण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करणे आवश्यक असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. महाराष्ट्राच्या आपत्ती मदत व्यवस्थेनुसार दुष्काळ हा अधिसूचित नैसर्गिक आपत्तीच्या प्रकारात समाविष्ट असून, पिकांच्या नुकसानीसाठी शासनाने निर्धारित निकषांनुसार मदतीची तरतूद आहे. नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे संबंधित अधिकारी करतात आणि त्यानंतर प्रस्ताव तहसील व जिल्हास्तरावर पाठविण्याची प्रक्रिया आहे. शेतकऱ्यांशी थेट संवाद पाहणीदरम्यान शेतकऱ्यांनी पिकांचे नुकसान, पावसाची कमतरता आणि शेतीसमोरील विविध अडचणी आमदार कुचे यांच्यासमोर मांडल्या. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून परिस्थितीची माहिती घेण्यात आली. शेतकऱ्यांच्या अडचणी केवळ कागदोपत्री न राहता त्यावर प्रत्यक्ष कार्यवाही व्हावी, यासाठी प्रशासनाशी समन्वय ठेवून पाठपुरावा करण्याचे आश्वासन देण्यात आले. यावेळी हरिश्चंद्र बाबा शिंदे, अनिलराव कोलते, पद्माकर जऱ्हाड, गणेश कोल्हे, सुरेश लहाने, कारभारी देवकर, राम पाटील खरात, राधाकिसन शिंदे, बळीराम गिते, राधाकिसन धोत्रे, गजानन काटकर, राजू निंबाळकर, प्रभाकर जोशी, कृष्णा रोडे, योगेश कान्हेरे, अंकुश जमधडे, कल्याण पवार, जनार्धन कोलते, अशोक पवार, बळीराम भडांगे, नंदू धोत्रे, संभाजी कान्हेरे यांच्यासह परिसरातील शेतकरी बांधव, भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

तहसीलदार श्री. शंकर हंदेश्वर व तालुका कृषी अधिकारी श्री. गोपाल गुजर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी दुष्काळी परिस्थिती, पिकांची सद्यस्थिती, संभाव्य नुकसान, पंचनामे, आवश्यक उपाययोजना आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

### खेळांमुळे व्यक्तिमत्त्वाला...

अध्यक्षस्थानी तायक्कांदो असोसिएशन ऑफ जालनाचे अध्यक्ष अरविंद देशमुख होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून असोसिएशनचे महासचिव सचिन आर्य, क्रीडा अधिकारी जोगदंड, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शेख नईम वस्ताद, पत्रकार सदानंद देशमुख, राजा शिवछत्रपती मार्शल आर्ट असोसिएशनचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक पडूळ तसेच जिल्हा स्त्री रुग्णालयाचे कार्यालयीन अधीक्षक द्वारकादास चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. गवारे पुढे म्हणाले की, शालेय जीवनापासूनच मैदानी खेळांची सवय असणे काळाची गरज आहे. खेळातील जय-पराजयापेक्षा खिलाडूवृत्ती अंगीकारणे अधिक महत्त्वाचे असून अशा स्पर्धांतूनच उद्याचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्षीय भाषणात अरविंद देशमुख म्हणाले की, ग्रामीण व शहरी भागातील शालेय खेळाडूंमध्ये अफाट क्षमता असून, त्यांना योग्य व्यासपीठ आणि तंत्रशुद्ध प्रशिक्षण मिळवून देणे हाच असोसिएशनचा मुख्य उद्देश आहे. तायक्कांदो हा केवळ पदकांपुरता मर्यादित खेळ नसून ती जीवन जगण्याची कला व स्वसंरक्षणाचे प्रभावी माध्यम आहे. जालना जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी विभागीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवावा, असे आव्हान त्यांनी केले.

या स्पर्धेत जालना जिल्ह्यातील विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील सुमारे ७० ते ७५ खेळाडूंनी सहभाग नोंदवत आपले कौशल्य पणाला लावले. या स्पर्धेतील विविध वजन गटातील विजेत्या खेळाडूंची आगामी विभागीय शालेय तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

स्पर्धेचे सामने सुरळीत पार पाडण्यासाठी पंच म्हणून फाईम खान, सय्यद निसार, राहुल ढाकणे, आदित्य चव्हाण, विष्णू चव्हाण, भागवत गोरे आणि सोनाली पंडित यांनी काम पाहिले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी क्रीडा मार्गदर्शक, क्रीडा शिक्षक, पालक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### १४ वर्षांखालील...

वाजण्यापूर्वी मैदानावर उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या निवड चाचणीतून पात्र ठरणाऱ्या खेळाडूंची जालना जिल्हा संघासाठी निवड केली जाणार आहे. निवड झालेल्या खेळाडूंना पुढे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय निमंत्रितांच्या स्पर्धेत जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातील १४ वर्षांखालील क्रिकेटपटूंसाठी ही निवड चाचणी महत्त्वाची ठरणार असून, ग्रामीण तसेच शहरी भागातील गुणवंत खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे.

जालना जिल्ह्यातील शालेय व युवा क्रिकेटमध्ये अनेक गुणवान खेळाडू असून, अशा खेळाडूंना जिल्हा पातळीवरून पुढे जाण्यासाठी निवड चाचण्यांच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध होत आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी युवा खेळाडूंच्या क्रिकेट कारकिर्दीसाठी महत्त्वाची ठरू शकते.

या निवड चाचणीसाठी जालना जिल्ह्यातील पात्र खेळाडूंनी वेळेत उपस्थित राहून आपले क्रिकेट कौशल्य दाखवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९८२३३७३३६१ / ९९२२९३३१३८

जिल्हा क्रिकेट असोसिएशन जालना अध्यक्ष ॲड. नरेंद्र देशपांडे, तसेच राजू काने, अभिजीत चव्हाण आणि इतर पदाधिकाऱ्यांच्या वतीने जिल्ह्यातील पात्र खेळाडूंनी या निवड चाचणीत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### मराठवाडा संघटन...

महिला जिल्हासंघटक कालिंदाताई ढगे आणि युवती सेना जिल्हासंघटक रोहिणी पिंपळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच उपजिल्हाप्रमुख भूषण शर्मा, प्रवीण फुके पाटील, संतोष मोहिते, रावसाहेब पवार; युवा जिल्हा समन्वयक संतोष जेधे पाटील; युवासेना जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर, अजय कदम; युवासेना लोकसभा प्रमुख गणेश मोहिते; तालुकाप्रमुख कल्याणराव अवघड, भगवान अंभोरे, नानासाहेब वानखेडे, दत्तात्रय बंगाळे, उदयकुमार बोराडे, अमोल सुरुंग, बापूसाहेब आर्दड, शिवाजी जऱ्हाड, विशाल गाडे; महिला तालुका संघटक छायाताई जऱ्हाड, शोभाताई वाघराळ; महिला शहरप्रमुख उज्ज्वलाताई पोखरिया; जि. प. सदस्य कैलास चव्हाण, सुधाकर वाढेकर, बबनराव खरात; युवासेना तालुकाप्रमुख नागेश डवले, ईश्वर जुंबड, बालाजी पवार, गणेश पुंगळे; मनपा विरोधी पक्षनेते कमलेश खरे; गटनेते दीपक राठोड; नगरसेवक दुर्गेश कठोटीवाले, अश्विन अंबेकर, किशोर पांगारकर, डुकरे पाटील; शहर संघटक योगेश रत्नपारखे, घनश्याम खाकीवाले, जफरखान पठाण, शेख नजीर; माजी शहरप्रमुख बाला परदेशी; उपतालुकाप्रमुख महादू गीते, रतनकुमार नाईक, सागर पाटील, अंबादास कोळसकर, सखाराम लेके, कडूबा इंदलकर, रामकिसन कायंदे, अमोल दाभाडे, देवा ढाकणे, राहुल निगवेकर, सर्जेराव वाघ, बाळू पाचरणे आणि प्रकाशराव खरात यांच्यासह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, दलित आघाडी, कामगार सेना, किसान सेना, अल्पसंख्याक सेना व शिवउद्योग सहकार सेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मराठवाड्यातील दुष्काळावर...

काही पिके बाहेरून हिरवीगार दिसत असली, तरी त्यातून अपेक्षित उत्पादन मिळणार नसल्याचे शेतकऱ्यांनी निदर्शनास आणून दिल्याचे सांगण्यात आले. पिकांची प्रत्यक्ष स्थिती लक्षात घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देताना केवळ पिकांचा बाह्य हिरवेपणा हा निकष न ठेवता प्रत्यक्ष उत्पादनक्षमता आणि झालेल्या नुकसानीचा विचार करावा, अशी भूमिका मांडण्यात आली. दुष्काळामुळे खरीप हंगामाचे मोठे नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये आर्थिक मदत देण्याची मागणी करण्यात आली. त्याचबरोबर शेतीतील कामांवर अवलंबून असलेल्या शेतमजुरांनाही या संकटाचा मोठा आर्थिक फटका बसला असल्याने प्रतिकुटुंब २५ हजार रुपये मदत देण्याची मागणी करण्यात आली.

मागील वर्षी करण्यात आलेल्या घोषणेनुसार १७ हजार ५०० रुपये प्रतिहेक्टरी पीकविमा मिळावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये पीकविम्याच्या रकमा अद्याप प्रलंबित असल्याचा मुद्दा उपस्थित करून संबंधित शेतकऱ्यांना विम्याची रक्कम तातडीने मिळण्यासाठी कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांवरील कर्जाचा आर्थिक भार वाढत असल्याने कर्जमाफी योजनेची अंमलबजावणी वेगाने करून पात्र शेतकऱ्यांना तातडीने कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी करण्यात आली. कर्जमाफीचा लाभ मिळाल्यानंतर शेतकऱ्यांना नव्याने पीककर्ज उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी, असेही यावेळी मांडण्यात आले.

याशिवाय नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आलेले ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान त्यांच्या खात्यावर तातडीने वर्ग करण्याची मागणी करण्यात आली. दुष्काळाचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित नसून काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची परिस्थितीही गंभीर होत असल्याचे यावेळी निदर्शनास आणून देण्यात आले. त्यामुळे संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच आवश्यक नियोजन करावे आणि प्रभावित गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. विभागीय आयुक्तांच्या भेटीदरम्यान बदनापूर विधानसभा मतदारसंघाचे नेते बबलूजी चौधरी, धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, माजी आमदार संजय वाकचौरे, सरचिटणीस पंकज नाना बोराडे, जालना जिल्हाध्यक्ष संजय काळभांडे, युवक शहर जिल्हाध्यक्ष राजेंद्र जाधव, परभणी जिल्हाध्यक्ष भीमराव हत्तीअंबीरे, तसेच कपिल आकात, संजय शेटे, अजय गव्हाणे, आशिष पवार, शेखर घोडके, प्रवीण साळुंके यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेऊन शेतकरी आणि शेतमजुरांना तातडीने आर्थिक मदत मिळावी, प्रलंबित पीकविमा वितरित व्हावा आणि कर्जमाफी व प्रोत्साहनपर अनुदानाच्या योजनांची अंमलबजावणी वेगाने व्हावी, या मागण्यांवर यावेळी भर देण्यात आला.

### बकरी चोरीच्या...

चौकशीदरम्यान पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून बकरी चोरीसाठी वापरण्यात आलेली स्विफ्ट कार आणि चोरीचे साहित्य जप्त केले. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ४ लाख १ हजार २०० रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

परतूर पोलीस ठाण्याच्या अभिलेखाची पाहणी केली असता गु.र.नं. ४६८/२०२६, कलम ३०३(२) अन्वये बकरी चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे तपासात समोर आले.

यानंतर आरोपीची अधिक सखोल चौकशी करण्यात आली. त्यावेळी त्याने साथीदाराच्या मदतीने मागील सुमारे दीड ते दोन वर्षांपासून जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत बकऱ्या चोरल्याचे सांगितल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

पोलिसांनी आरोपीने दिलेल्या माहितीनुसार संबंधित पोलीस ठाण्यांच्या अभिलेखांची तपासणी केली. या तपासणीत विविध ठिकाणी बकरी चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे समोर आले. त्यानुसार एकूण १८ गुन्हे उघडकीस आल्याचे पोलिसांनी जाहीर केले आहे. उघडकीस आलेल्या गुन्ह्यांमध्ये परतूर पोलीस ठाण्यातील एक, बदनापूरमधील तीन, अंबडमधील चार, चंदनझिरामधील एक, मौजपुरीमधील तीन, मंठामधील एक, सदर बाजारमधील दोन, जालना तालुका पोलीस ठाण्यातील एक, तीर्थपुरीतील एक आणि पारध पोलीस ठाण्यातील एक अशा गुन्ह्यांचा समावेश आहे.

पोलिसांनी उघडकीस आणलेल्या १८ गुन्ह्यांपैकी काही गुन्हे २०२५ सालातील, तर काही गुन्हे २०२६ सालातील आहेत. त्यामुळे या टोळीच्या हालचाली दीर्घकाळापासून सुरू असल्याचा तपासाचा एक महत्त्वाचा धागा पोलिसांच्या हाती लागला आहे.

उघडकीस आलेल्या गुन्ह्यांमध्ये परतूर गु.र.नं. ४६८/२०२६, बदनापूर गु.र.नं. ४१४/२०२६ व ४०८/२०२५, अंबड गु.र.नं. ५२६/२०२६, ५४३/२०२६, ३३४/२०२६ व १७३/२०२६, चंदनझिरा गु.र.नं. ४७१/२०२६, मौजपुरी गु.र.नं. १५५/२०२६, १९९/२०२५ व १३१/२०२५, मंठा गु.र.नं. १३३/२०२६, सदर बाजार गु.र.नं. १६६/२०२६ व ५५५/२०२५, जालना तालुका गु.र.नं. ४११/२०२५, तीर्थपुरी गु.र.नं. ९४/२०२५ आणि पारध गु.र.नं. १३/२०२५ यांचा समावेश असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या प्रकरणात सलीम सांडु शेख, रा. औरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर हा संशयित साथीदार फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. त्यामुळे त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे. चोरीच्या घटनांमध्ये आणखी कोणी सहभागी आहे का, चोरी केलेल्या बकऱ्यांची विल्हेवाट कुठे लावली जात होती आणि या टोळीचे आणखी गुन्ह्यांशी संबंध आहेत का, या दिशेनेही तपास होण्याची शक्यता आहे.

जेरबंद आरोपी रईस सरदार शहा याला पुढील तपासासाठी परतूर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे. संबंधित गुन्ह्यांचा पुढील तपास परतूर पोलीस करत आहेत. दरम्यान, एकाच आरोपीच्या चौकशीत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील १८ बकरी चोरीचे गुन्हे उघड झाल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईकडे लक्ष लागले आहे. या तपासातून आणखी काही चोरीच्या घटनांचा उलगडा होतो का, तसेच फरार साथीदाराला कधी ताब्यात घेतले जाते, याकडेही आता लक्ष आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू आणि अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर वाघ, कैलास खार्डे, इरशाद पटेल, सागर बावीस्कर, दत्ता वाघुंडे, बाबा गायकवाड, शिव एखंडे, घिरज भोसले आणि अशोक जाधवर यांनी केली.

### शेतकऱ्यांच्या बांधावर...

करण्यात आले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ७५ हजार रुपयांची तातडीची आर्थिक मदत द्यावी, आजपर्यंतची कर्जमाफी तातडीने व सरसकट करावी, तसेच पीकविम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ जमा करावी, आदी प्रमुख मागण्या निवेदनातून करण्यात आल्या. यावेळी खासदार डॉ. कल्याणराव काळे म्हणाले की, शेतकऱ्यांची खरी परिस्थिती समजून घेण्यासाठी काँग्रेसच्या वतीने प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन पाहणी करण्यात आली आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने मदत जाहीर करावी. मागण्या मान्य न झाल्यास ५ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल. त्यानंतरही सरकारने दखल घेतली नाही तर गावागावात आंदोलन उभारून शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी सरकारला भाग पाडू , असा इशारा त्यांनी माध्यमाशी बोलताना दिला. दरम्यान, खरीप हंगामातील पिकांचे प्रत्यक्ष पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

### सायन्स सेंटरसाठी...

विश्वस्त तथा कुंडलिका सीना रिज्युनेशन फाउंडेशनच्या अध्यक्षा नूतनदीदी देसाई यांच्या हस्ते पार पडले, याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून अंजली शर्मा बोलत होत्या. व्यासपीठावर प्रमुख वक्ते म्हणून परभणी ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे अध्यक्ष डॉ. रामेश्वर नाईक, सहयोगी उद्योजक अक्षय अर्जुन गेही, जालना एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष सुनील रायठठ्ठा, उपाध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी यांची उपस्थिती होती.

अंजली शर्मा पुढे म्हणाल्या की, जालना एज्युकेशन फाउंडेशनने पुढाकार घेऊन सुरू केलेले सायन्स सेंटर आणि विज्ञान वाचनालय अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे. वास्तविक प्रशासनाने करायला हवे ते काम आज सिव्हिल सोसायटी एकत्र येऊन करत असल्याचा मनस्वी अभिमान वाटतो. शालेय वयातच विज्ञानाशी प्रत्यक्ष संबंध आला, तर मुलांच्या विचारसरणीला योग्य व वास्तववादी दिशा मिळते. आजच्या मुलांना पुस्तकी ज्ञानासोबतच विज्ञानाचे असे प्रत्यक्ष अनुभव मिळण्याची गरज आहे, असे त्या म्हणाल्या.

नूतनदीदी देसाई म्हणाल्या की, आजच्या डिजिटल आणि स्क्रीनच्या युगात प्रत्यक्ष पुस्तकांपासून मुले दुरावत चालली आहेत. परंतु पुस्तके हीच मुलांचे खरे मित्र असतात. या विज्ञान वाचनालयाच्या माध्यमातून मुलांना पुस्तकांची गोडी लागावी, मुलांनी येथे येऊन अधिकाधिक वाचन करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या वाचनालयासाठी लागणाऱ्या सर्व पुस्तकांची जबाबदारी उचलण्याची तयारी दर्शवत, शहरात भव्य सायन्स सेंटर आणि लॅब उभी राहावी यासाठी मनपाने पुढाकार घेऊन जागा द्यावी, अशी विनंतीही त्यांनी आयुक्तांकडे केली. याशिवाय यंदा पावसाचे प्रमाण कमी असल्याने सर्वांनी पाणी जपून वापरण्याचे आणि आगामी जलसंकटाचा सामना करण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

जालना एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष सुनील रायठठ्ठा यांनी शोधवाटीकेचा उद्देश विशद करून, विज्ञान प्रेमींच्या आणि दानदात्यांच्या सहकार्यामुळे आम्हाला हे कार्य पुढे नेता येत आहे. प्रास्ताविकात प्रा. सुरेश लाहोटी यांनी २००८ पासून जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती दिली. केवळ ग्रंथालयात पुस्तके पडून न राहता ती प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात पडावीत, मुलांनी वर्षाला किमान ३ ते ४ विज्ञानाची पुस्तके वाचावीत. शहरात इतर महानगरांप्रमाणे सुसज्ज सायन्स सेंटर उभे राहावे, हीच आमची मूळ संकल्पना आहे, असे ते म्हणाले.

यावेळी जालना एज्युकेशन फाउंडेशनचे सचिव सुरेश कुलकर्णी म्हणाले की, विज्ञान शोधवाटीकेत गेल्या दोन वर्षात ४८५२ विद्यार्थ्यांनी भेट देऊन अभ्यासक्रमातील विज्ञानाचे प्रयोग स्वतःच्या हाताने केले आहेत. आता नूतन विज्ञान वाचनालय सुरू करण्यात आले असून, मोबाईल लायब्ररीच्या माध्यमातून शहरातील किमान २० शाळांमध्ये ही पुस्तके पोचवून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी निर्माण करण्याचा आमचा मनोदय आहे.

या कार्यक्रमाला शहरातील विज्ञानप्रेमी नागरिक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राहत सोशल ग्रुप...

विनंती आहे की, आपल्या मुलामुलींची नोंदणी करण्यासाठी १५ नोव्हेंबरपूर्वी राहत सोशल ग्रुप जालनाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

### आष्टी येथे सावली...

संघ बैठक तसेच ग्राम संघ बैठकीस गैरहजर राहणाऱ्या संबंधित पदाधिकाऱ्यांवर ५०० रुपये दंड आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच सीएलएफ मॅनेजर यांच्या ११ महिन्यांच्या मूल्यांकनानंतर ५ टक्के मानधनवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. पशुसखी, कृषिसखी व ग्रामसखी यांनी गावपातळीवर किमान १६ दिवस काम करणेआवश्यक करण्यात आले. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, कुटुंबांचे उत्पन्न वाढविणे, स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण करणे, महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देणे तसेच उमेद अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना स्वावलंबी करण्याच्या दृष्टीने हे ठराव महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या वार्षिक सर्वसाधारण सभेस आष्टी प्रभागातील सर्व पदाधिकारी, सदस्य तसेच उमेद अभियानाची टीम मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### शेतकऱ्यांना तात्काळ...

करण्यात आली. शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अन्यथा संघटनेच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

धर्मवीर छावा संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष शेतकरी आघाडी सूर्यप्रकाश जाधव व जालना जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण गाडेकर पाटील यांच्या वतीने या मागण्या मांडण्यात आल्या.

# नात्यातील कटुता धोकादायक; संवादातून नात्यांमध्ये विश्वासाचा पूल बांधा!

पती-पत्नीच्या नात्यातील वाढती कटुता आणि त्यातून घडणाऱ्या गंभीर घटना ही आजच्या समाजासमोरील चिंतेची बाब बनली आहे. संशयातून पतीने पत्नीचा खून केला किंवा पत्नीने कोणाच्या तरी मदतीने पतीचा खून केला, अशा घटना अधूनमधून कानावर येतात. पती-पत्नीच्या पवित्र नात्याला काळिमा फासणाऱ्या या घटना केवळ संबंधित कुटुंबापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर संपूर्ण समाजाला अंतर्मुख करायला लावतात. प्रेम, विश्वास आणि समजूतदारपणावर उभे राहणारे नाते जेव्हा संशय, राग, अहंकार आणि द्वेषाच्या भोवऱ्यात सापडते, तेव्हा त्याचे परिणाम किती गंभीर होऊ शकतात, याची जाणीव या घटनांमधून होते. पती-पत्नीचे नाते हे केवळ दोन व्यक्तींमधील नाते नसते, तर दोन कुटुंबांना जोडणारा एक महत्त्वाचा भावनिक दुवा असतो. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर एकमेकांना साथ देण्याचे, सुख-दुःखात सहभागी होण्याचे आणि परस्परांच्या भावना समजून घेण्याचे वचन या नात्यात दिले जाते. संसार म्हटला की मतभेद, वादविवाद, आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि अनेक आव्हाने आलीच. मात्र, या आव्हानांना सामोरे जाताना पती-पत्नीमध्ये परस्पर विश्वास आणि समजूतदारपणा असणे अत्यंत आवश्यक आहे. मतभेद होणे स्वाभाविक असले, तरी त्या मतभेदांचे रूपांतर मनभेदांत होऊ नये, याची काळजी दोघांनीही घेतली पाहिजे.

आजच्या धावपळीच्या जीवनात माणसाच्या आयुष्यातील ताणतणाव वाढत आहेत. नोकरी, व्यवसाय, आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि बदलती जीवनशैली यांचा परिणाम वैवाहिक नात्यांवरही होताना दिसतो. अनेकदा छोट्या-छोट्या कारणांवरून वाद होतात. सुरुवातीला किरकोळ वाटणारे मतभेद योग्य वेळी सोडवले गेले नाहीत, तर त्यातून मनात कटुता निर्माण होऊ शकते. एकमेकांशी संवाद साधण्याऐवजी अबोला धरणे, प्रत्येक गोष्टीत दोष शोधणे, जुन्या चुका वारंवार उकरून काढणे आणि एकमेकांवर अविश्वास दाखवणे यामुळे नात्यातील दरी अधिक रुंदावत जाते.

संशय हा वैवाहिक नात्यातील विश्वासाला पोखरणारा सर्वांत मोठा घटक ठरू शकतो. कोणत्याही ठोस कारणाशिवाय जोडीदारावर संशय घेणे, त्याच्या प्रत्येक कृतीचा चुकीचा अर्थ लावणे किंवा त्याच्यावर सतत नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करणे, यामुळे नात्यातील मोकळेपणा नष्ट होतो. विश्वासाच्या जागी संशयाने आणि प्रेमाच्या जागी भीतीने प्रवेश केला, तर नात्यातील सहजता हरवते. मात्र, नात्यातील कटुतेला केवळ एका व्यक्तीला जबाबदार धरण्याऐवजी परिस्थिती, परस्परांचे वर्तन आणि समस्यांची मुळे समजून घेणेही आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा मानसिक किंवा शारीरिक छळ हा नात्याचा अविभाज्य भाग मानता कामा नये. पती-पत्नीच्या नात्यातील कटुता दूर करण्यासाठी संवाद हा सर्वांत महत्त्वाचा मार्ग आहे. संवाद म्हणजे केवळ आपले म्हणणे दुसऱ्याला ऐकवणे नव्हे, तर समोरच्या व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, तिच्या भावना समजून घेणे आणि मतभेदांवर परस्पर संमतीने मार्ग काढणे होय. रागाच्या भरात बोललेले शब्द नात्याला खोल जखमा देऊ शकतात. त्यामुळे वादाच्या वेळी संयम राखणे, एकमेकांचा अपमान टाळणे आणि प्रश्न चिघळण्याऐवजी तो सोडवण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. संवादाच्या माध्यमातून अनेक गैरसमज दूर होऊ शकतात आणि नात्यातील विश्वास पुन्हा दृढ होऊ शकतो.

काही वेळा मात्र नात्यातील समस्या इतक्या गुंतागुंतीच्या होतात की, केवळ परस्पर संवादाने त्यांचे निराकरण होत नाही. अशा वेळी वैवाहिक समुपदेशक, मानसोपचारतज्ज्ञ किंवा विश्वासार्ह तज्ज्ञांची मदत घेणे उपयुक्त ठरू शकते. समुपदेशन घेणे म्हणजे नाते अपयशी ठरल्याची कबुली नव्हे, तर नाते सुधारण्यासाठी केलेला सकारात्मक प्रयत्न आहे. तसेच नात्यात हिंसा, धमकी किंवा असुरक्षितता असेल, तर सुरक्षिततेला प्राधान्य देऊन विश्वासार्ह व्यक्तींची आणि संबंधित यंत्रणांची मदत घेणे आवश्यक आहे. पती-पत्नीमधील संघर्षाचा सर्वाधिक परिणाम अनेकदा मुलांवर होतो. घरातील सततचे भांडण, तणावपूर्ण वातावरण आणि असुरक्षिततेची भावना यामुळे मुलांच्या भावविश्वावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे वैवाहिक नात्यातील मतभेद सोडवताना मुलांच्या भावनिक सुरक्षिततेचाही विचार केला पाहिजे. कुटुंबातील शांतता आणि सुसंवाद ही मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची बाब आहे. समाजानेही वैवाहिक नात्यांमधील समस्यांकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे. पती-पत्नीमध्ये मतभेद झाले तर त्यांची टिंगल करणे, एका व्यक्तीला दोष देणे किंवा त्यांच्या खासगी आयुष्यात अनावश्यक हस्तक्षेप करणे टाळले पाहिजे. गरज पडल्यास योग्य मार्गदर्शन आणि भावनिक आधार देण्यासाठी कुटुंबीयांनी पुढाकार घेतला पाहिजे. नात्यातील समस्या लपवून ठेवण्यापेक्षा त्या योग्य व्यक्तीसमोर मांडण्याचे धैर्य निर्माण होणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

शेवटी, कोणतेही नाते टिकवण्यासाठी प्रेमाइतकीच विश्वासाची आणि समजूतदारपणाची गरज असते. संसारात मतभेद असू शकतात; परंतु ते विकोपाला जाऊ देणे टाळणे ही दोघांचीही जबाबदारी आहे. संशय, अहंकार आणि राग यांना नात्यावर वर्चस्व गाजवू देण्याऐवजी संवाद, संयम आणि परस्पर आदर यांना महत्त्व दिले पाहिजे. नात्यात कटुता निर्माण झाल्यानंतर पश्चात्ताप करण्यापेक्षा, कटुता वाढण्याआधी संवादाचा मार्ग स्वीकारणे अधिक शहाणपणाचे आहे. कारण नाती जोडण्यासाठी अनेक वर्षे लागतात; मात्र ती तुटण्यासाठी कधी कधी एक क्षणही पुरेसा ठरतो. त्यामुळे नात्यांमधील विश्वास जपणे, कटुता वेळीच दूर करणे आणि संवादातून नात्यांना नव्याने बहर आणणे, ही काळाची गरज आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## उल्लेखनीय सेवाकार्याबद्दल डॉ. सुयोग कुलकर्णी व ॲड. भरत मंत्री यांचा सन्मान

**जालना - प्रतिनिधी**

लॉयन्स क्लब ऑफ जालना अंतर्गत सन २०२५-२६ मध्ये समाजातील गरजू व्यक्तींसाठी उल्लेखनीय सेवा कार्य तसेच क्लबच्या विविध उपक्रमांना दिलेल्या सक्रिय योगदानाबद्दल लॉ. डॉ. सुयोग कुलकर्णी आणि लॉ. ॲड. भरत मंत्री यांना विशेष अवार्ड व रिवॉर्ड देऊन गौरविण्यात आले.

डॉ. सुयोग कुलकर्णी व ॲड. भरत मंत्री यांनी शेतकरी बांधवांसाठी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंद शस्त्रक्रिया यांसारखा महत्त्वपूर्ण सेवा प्रकल्प राबविला. या उपक्रमातून गरजू शेतकरी व नागरिकांना नेत्र तपासणीची सुविधा तसेच आवश्यक असलेल्या रुग्णांना मोतीबिंद शस्त्रक्रियेची मदत मिळाली. तसेच बांबू लागवडीबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी विशेष बैठक आयोजित करून बांबू लागवडीचे फायदे, लागवड पद्धती व उपलब्ध संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शेतकऱ्यांना शेतीसोबत पूरक उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. या उल्लेखनीय सेवा कार्याची आणि क्लबच्या उपक्रमांना दिलेल्या सहकार्याची दखल घेत लायन्स क्लब ऑफ जालनाच्यावतीने उभयतांचा गौरव करण्यात आला.

यावेळी लायन्स क्लब ऑफ जालनाचे मावळते अध्यक्ष राधेश्याम टीबडेवाल, सचिव लायन राजेश खिस्ते, कोषाध्यक्ष रतन बजाज, माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरीया तसेच कविता बजाज यांची उपस्थिती होती.

लायन्स क्लब ऑफ जालनातर्फे करण्यात आलेला हा सन्मान म्हणजे सेवा, समर्पण आणि सामाजिक बांधिलकीला दिलेली पावती असून, अशा सेवाभावी कार्यातून समाजातील गरजू घटकांना अधिकाधिक मदत मिळावी, हा क्लबचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे.

## भूतानमध्ये ''झेप'' ! १९ वे सावरकर संमेलन

भूतानच्या थिंपू या राजधानीत येत्या २ ऑक्टोंबर रोजी होत आहे.

या संमेलनात सावरकरांच्या अनेक पैलूंवर लेख असलेल्या स्मरणिकेचे, देवेंद्र भुजबळ यांच्या ''झेप'' पुस्तकाचे, शैलजा देशपांडे यांचं ''अनादि मी'', या पुस्तकांचे प्रकाशन देखील होणार आहे.

'' झेप ''

'' झेप'' या पुस्तकात विविध क्षेत्रात लक्षणीय झेप घेतलेल्या सर्वश्री डॉ विजय भटकर,डॉ रघुनाथ शेवगावकर,विकास खारगे, तुकाराम मुंडे,नयना गुंडे, सदानंद शेटे, डॉ विजय शिरीषकर, सुधाकर तोरणे ,दिलीप स्वामी,भावेश भाटिया, अण्णासाहेब टेकाळे, राधिका भांडारकर, आर आर लेमाडे,मारुती कदम,राम काजरोळकर, कृष्णा दिवटे,उमाकांत रासने, शरद चौधरी, नंदकुमार पाटील,अमोल मोहोळकर, सुखदा प्रधान सिंग,प्रमोद झिंजाडे, सुभाष खाकाळ,प्रा डॉ मनिषा चाळसे,दिलीप पाथरे,




अनिल राजपिसे,शोभा जोपुळे, विराग मधुमालती, अश्विनी भोईर, पुनिता भडसावळे,डॉ श्यामल सरडकर,जे पी देसाई , यज्ञेश सावे,अक्षय जाधव, मनीष गवई आणि अलका भुजबळ यांच्या प्रेरणादायी यश कथा आहेत.

या यश कथा सर्वश्री प्रा डॉ नरेशचंद्र काठोळे, सुनील चिटणीस,नंदकुमार रोपळेकर, महेबूब कासार, नितांत राऊत, रश्मी हेडे आणि देवेंद्र भुजबळ यांनी लिहिलेल्या असून न्यूज स्टोरी टुडे प्रकाशक आहे.

## विमुक्त जाती, भटक्या जमातींच्या नागरिकांसाठी विशेष अभियान : 'भटके-विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान'चा लाभ घेण्याचे सहायक संचालक अनंत कदम यांचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना आवश्यक ओळखपत्रे व विविध प्रमाणपत्रे सुलभतेने उपलब्ध करून देण्यासह शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' अभियानांतर्गत २७, २८ आणि २९ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्ह्यात विशेष 'भटके-विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान' राबविण्यात येणार आहे. पात्र नागरिकांनी या विशेष अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अनंत कदम यांनी केले आहे. या अभियानासाठी महसूल विभाग, योजनांशी संबंधित विविध शासकीय विभाग तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंडळ व तालुकास्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. विमुक्त जाती व भटक्या जमातींची भटकंतीची जीवनशैली लक्षात घेऊन शासनाच्या विविध योजना आणि मूलभूत हक्कांशी संबंधित कागदपत्रे त्यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे हा अभियानाचा उद्देश आहे.

अभियानात आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, जात प्रमाणपत्र, आयुष्मान भारत कार्ड, उत्पन्नाचा दाखला, नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, रहिवासी अथवा अधिवास दाखला, विवाह नोंदणी तसेच दिव्यांग प्रमाणपत्र यासारखी आवश्यक कागदपत्रे पात्र लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही करण्यात येणार आहे. यासोबतच श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, प्रधानमंत्री आवास योजना आणि प्रधानमंत्री किसान सन्मान निधी यासह विविध शासकीय योजनांचा पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित विभागांची यंत्रणा शिबिरांमध्ये उपस्थित राहणार आहे.

तालुकानिहाय शिबिरांचे वेळापत्रक

जालना तालुका : २७ सप्टेंबर रोजी शिकलगीर वस्ती, रामनगर, जालना येथे, तर २८ सप्टेंबर रोजी वडार वस्ती, शिवनगर, जालना येथे शिबिर होणार आहे. बदनापूर तालुका : २७ सप्टेंबर रोजी बंजारा वस्ती, आन्वी येथे, २८ सप्टेंबर रोजी बंजारा वस्ती, धामणगाव येथे, तर २९ सप्टेंबर रोजी बंजारा वस्ती, वसंतनगर येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अंबड तालुका : २७ सप्टेंबर रोजी नाथगोसावी वस्ती व बाबर वस्ती, अंबड येथे, तर २८ सप्टेंबर रोजी लोहार वस्ती व बंजारा वस्ती, शाहपूर येथे शिबिर होणार आहे. घनसावंगी तालुका : २७ सप्टेंबर रोजी भिल्लवस्ती, पारधी वस्ती, घनसावंगी शहर, कैकाडी वस्ती मांदळा रोड, घनसावंगी, कैकाडी वस्ती भावनगर, घनसावंगी शहर या परिसरातील संबंधित भटके-विमुक्त वस्त्यांमध्ये, २८ सप्टेंबर रोजी कैकाडी वस्ती, पारडगांव येथे, तर २९ सप्टेंबर रोजी कैकाडी वस्ती, रांजणी तसेच धनगर वस्ती, रांजणी येथे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. मंठा तालुका : २७ सप्टेंबर रोजी कैकाडी वस्ती, मंठा येथे, २८ सप्टेंबर रोजी बंजारा वस्ती, मंठा येथे, तर २९ सप्टेंबर रोजी धनगर वस्ती, तळणी येथे शिबिर होणार आहे. परतूर तालुका : २७ सप्टेंबर रोजी वडार वस्ती येथे, २८ सप्टेंबर रोजी शिकलकरी वस्ती, परतूर येथे, तर २९ सप्टेंबर रोजी बंजारा वस्ती, आष्टी येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

भोकरदन तालुका : २७ सप्टेंबर रोजी नाथगोसावी वस्ती, भोकरदन, गोसावी समाज वस्ती फत्तेपूर (शिबीर नाथगोसावी येथे) भोकरदन परिसरात, २८ सप्टेंबर रोजी पारधी वस्ती व लबानवस्ती- राजुर, परिसरात तर २९ सप्टेंबर रोजी तसेच बंजारा/ वस्ती, तपोवन, गोसावी वस्ती - मोतीनगर तपोवन परिसर येथे शिबिर होणार आहे.

# डिंभे-माणिकडोह बोगद्यासाठी आमदार रोहित पवार आक्रमक

## जिल्हाधिकाऱ्यांना भेटून दिला आंदोलनाचा इशारा



अहिल्यानगर, ता. २३ सरकारने स्थगिती दिलेल्या डिंभे-माणिकडोह जोड बोगदा प्रकल्पासाठी आमदार रोहित पवार हे आक्रमक झाले असून याबाबत त्यांनी आज जिल्हाधिकारी पंकज आशिया यांची भेट घेऊन डिंभे-माणिकडोह बोगद्याची चौथी सुधारीत प्रशासकीय मान्यता तत्काळ पुनरुज्जीवित करुन बोगद्याचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली. तसेच येत्या ५ ऑक्टोबरपर्यंत याबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास मोठे जनआंदोलन उभारण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. दरम्यान, या बैठकीत त्यांनी कर्जत-जामखेडमधील दुष्काळी परिस्थितीचाही आढावा घेऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. याबाबतचे निवेदनही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

गेल्या काही महिन्यांपासून आक्रमक मोडमध्ये असलेले कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार हे आता मतदारसंघातील पाण्यासाठी मैदानात उतरले आहेत. डिंभे-माणिकडोड जोड बोगद्याचा विषय राजकीय वर्तुळात गेल्या काही दिवसांपासून चांगलाच गाजत आहे. या जोड बोगद्यासाठी आमदार रोहित पवार हे पहिल्या टर्ममध्ये आमदार झाल्यानंतर गेल्या ७ वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. महाविकास आघाडी सरकारच्या काळातच तत्कालीन जलसंपदामंत्री जयंत पाटील यांच्याकडून त्यांनी या बोगद्याला मंजुरी आणली आहे. १६ किलोमीटर लांबीच्या या जोड बोगद्यामुळे पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर, शिरूर या कोणत्याही तालुक्याच्या हक्काचे १ थेंबही पाणी कमी न होता पावसाळ्यात डिंभे धरणातून वाहून जाणारे अतिरिक्त पाणी या बोगद्याद्वारे माणिकडोह धरणात आणणे, हा या प्रकल्पाचा मूळ उद्देश आहे. माणिकडोह धरणाच्या पाणलोट क्षेत्रात कमी पाऊस पडत असल्याने साधारणपणे हे धरण पाच वर्षांतून एकदाच भरते. त्यामुळे डिंभे धरणातून वाहून जाणारे पावसाचे अतिरीक्त पाणी माणिकडोह धरणामध्ये आणण्यासाठी हा बोगदा लवकर होणे अत्यंत गरजेचे आहे. यामुळे जुन्नर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत-जामखेड आणि करमाळा या तालुक्यांना एक अतिरिक्त आवर्तन मिळून येथील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्यासाठीच आमदार रोहित पवार यांनी २०२२ मध्ये तत्कालीन जलसंपदामंत्री जयंत पाटील यांच्यासोबत बैठक घेऊन डिंभे धरणाची पाणी पातळी ७०९ मीटर (मध्यावर) कायम ठेवूनच हा बोगदा करण्याबाबत सर्वसहमती घडवून आणली आहे.

महाविकास आघाडी सरकार गेल्यानंतर आलेल्या सरकाकडेही या बोगद्याच्या कामाला तांत्रिक, प्रशासकीय आणि प्रत्यक्ष गती देण्याबाबत त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. तसेच पालकमंत्री, जलसंपदामंत्री आणि मुख्यमंत्री यांचीही वेळोवेळी भेट घेऊन त्यांनाही निवेदने दिली आहेत. नुकतीच शासनाने ५७०४ कोटी ५० लाख रुपये खर्चाला चौथी सुधारीत प्रशासकीय मान्यताही दिली होती, परंतु आंबेगावचे आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या दबावामुळे १५ दिवसांपूर्वी या प्रकल्पाच्या चौथ्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेला सरकारने स्थागिती दिली आहे. हा निर्णय कर्जत-जामखेड मतदारसंघासह जुन्नर, पारनेर, श्रीगोंदा, करमाळा या तालुक्यातील शेतकऱ्यांवर अन्यायकारक असून शेतकऱ्यांच्या आशा-अपेक्षांवर पाणी फिरवणारा आहे. त्यामुळे तातडीने ही चौथ्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेला दिलेली स्थगिती तत्काळ पुनरुज्जीवित करुन बोगद्याचे काम तातडीने सुरू करण्याचे आदेश देण्याची मागणी आमदार रोहित पवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. तसेच येत्या ५ ऑक्टोबरपर्यंत सरकारने याबाबत निर्णय घेतला नाही तर जुन्नर, पारनेर, श्रीगोंदा आणि कर्जत या भागातील शेतकऱ्यांना सोबत घेऊन मोठे जनआंदोलन उभारण्याचा इशारा त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना भेटून दिला आहे. यावेळी खा. निलेश लंके हेही उपस्थित होते.

दरम्यान, कर्जत-जामखेडसह संपूर्ण जिल्ह्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर मागणी असलेल्या गावांमध्ये टँकर आणि चारा छावण्या सुरु करणे, उपलब्ध जलस्त्रोतातील पाणी नियोजन, विहिर व बोअरवेलचे अधिग्रहण, शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये तर शेतमजुरांना प्रती कुटुंब २५ हजार रुपये मदत करणे, कर्जमाफी योजनेचा आढावा घेऊन तातडीने सर्वांना या योजनेचा लाभ देणे, नियमित कर्जदारांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान वितरीत करणे, चुकीच्या पीक कापणी प्रयोगांना आळा घालणे, विद्यार्थ्यांची संपूर्ण शुल्कमाफी, सीना प्रकल्पात आवर्तन सोडणे या सर्व मुद्द्यांवरही यावेळी चर्चा झाली आणि याबाबतचे निवेदनही आमदार रोहित पवार यांनी यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. तसेच कर्जत-जामखेड मतदारसंघात वीज पुरवठ्याचाही प्रश्न गंभीर असून महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे याबाबत पाठपुरावा सुरु आहे, परंतु नागरिकांना १२ तास सलग वीज पुरवठा झाला पाहिजे याबाबत जिल्हाधिकारी म्हणून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्याची मागणीही यावेळी आमदार रोहित पवार यांनी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्याकडे केली.

***''डिंभे-माणिकडोह बोगद्यामुळे कोणत्याही तालुक्याचे पाणी कमी न होता माझ्या मतदारसंघासह जुन्नर, पारनेर, श्रीगोंदा आणि करमाळा या तालुक्यातील शेतकऱ्यांना एक जादा आवर्तन मिळणार आहे. परंतु या कामाला स्थगिती देण्यात आल्याचं कळतंय, ती का देण्यात आली हे कळत नाही. उलट जे नेते या बोगद्याला आज विरोध करत आहेत त्यांनीच २०१८ मध्ये बोगदा करण्याबाबत आणि डिंभे धरणातून तळापासून पाणी घेण्याबाबत शासनाला पत्र दिले होते, परंतु कोणत्याही तालुक्यावर अन्याय नको म्हणून २०२२ मध्येही आम्ही तत्कालीन जलसंपदामंत्र्यांसोबत बैठक घेऊन डिंभे धरणाची पाणी पातळी ७०९ मीटर (मध्यभागी) स्थिर ठेवून बोगदा करण्याचा निर्णय घेतला. तरीही विरोध होत असेल तर हा अन्याय आम्ही का सहन करावा? याबाबत सरकारने ५ ऑक्टोबरपर्यंत योग्य निर्णय घेतला नाही तर नाईलाजाने शेतकऱ्यांचं जनआंदोलन उभारावं लागेल, असा अल्टीमेटम जिल्हाधिकाऱ्यांना भेटून दिला. तसंच मतदारसंघात दुष्काळाची अत्यंत गंभीर स्थिती असून याबाबत पदाधिकारी, कार्यकर्ते, अधिकारी आणि माझ्या टीमकडून घेतलेल्या आढाव्याचा अहवालही त्यांना सादर केला आणि तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.''**

**(रोहित पवार, आमदार कर्जत-जामखेड)**

# पथ विक्रेत्यांच्या प्रश्नांवर शहर पथ विक्रेता समितीच्या बैठकीत परखड चर्चा

## शासनाच्या पथ विक्रेता योजनेच्या अंमलबजावणीबाबत धनसिंह सूर्यवंशी यांनी मांडले प्रश्न



**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील पथ विक्रेत्यांच्या विविध प्रश्नांसह शासनाकडून पाठविण्यात आलेल्या पथ विक्रेता योजनेच्या अंमलबजावणीबाबत शहर पथ विक्रेता समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. महानगरपालिका आयुक्त तथा शहर पथ विक्रेता समितीच्या अध्यक्षा अंजली शर्मा यांच्या दालनात ही बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत पथ विक्रेत्यांच्या हिताशी संबंधित विविध बाबींवर चर्चा होत असताना पथ विक्रेता समितीचे सदस्य तथा हॉकर्स जॉइंट ॲक्शन कमिटीचे विभागीय अध्यक्ष धनसिंह सूर्यवंशी यांनी शासनाच्या पथ विक्रेता योजनेच्या अंमलबजावणीबाबत परखड मत मांडले. पथ विक्रेत्यांना शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही प्रभावीपणे करण्याची गरज असल्याचे त्यांनी बैठकीत नमूद केले.

शासनाकडून पथ विक्रेत्यांसाठी विविध योजना व तरतुदी करण्यात येतात. मात्र, या योजनांची माहिती आणि त्यांचा प्रत्यक्ष लाभ संबंधित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे असल्याचा मुद्दा बैठकीत उपस्थित करण्यात आला. पथ विक्रेत्यांना त्यांच्या व्यवसायासाठी आवश्यक सुविधा, प्रशासकीय सहकार्य आणि योजनांचा लाभ मिळण्याच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करण्याबाबतही चर्चा झाली.

धनसिंह सूर्यवंशी यांनी पथ विक्रेत्यांच्या प्रश्नांवर समितीसमोर भूमिका मांडताना संबंधित प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहावे, अशी मागणी केली. पथ विक्रेत्यांच्या उपजीविकेचा प्रश्न लक्षात घेऊन योजना राबविताना त्यांच्याशी समन्वय ठेवणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

महानगरपालिका आयुक्त तथा शहर पथ विक्रेता समितीच्या अध्यक्षा अंजली शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस एनयूएलएम विभागाचे प्रमुख श्री. सांगुळे यांच्यासह महानगरपालिकेच्या विविध विभागांतील प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

शहरातील पथ विक्रेत्यांच्या प्रश्नांवर समितीच्या माध्यमातून चर्चा करून त्यावर प्रशासकीय पातळीवर आवश्यक कार्यवाही करण्याबाबत बैठकीत विचारविनिमय करण्यात आला. बैठकीस शहर पथ विक्रेता समितीचे सदस्य सतीश पंच, सगीर अहमद, दिनकर घेवंदे, गंगुबाई वानखेडे, सुशील वाघमारे यांच्यासह इतर सदस्य उपस्थित होते.

पथ विक्रेत्यांच्या उपजीविकेशी संबंधित प्रश्न, शासनाच्या योजनांची अंमलबजावणी आणि प्रशासन व पथ विक्रेते यांच्यातील समन्वय या मुद्द्यांवर बैठकीत चर्चा झाल्याने आगामी काळात समितीच्या माध्यमातून कोणत्या उपाययोजना केल्या जातात, याकडे पथ विक्रेत्यांचे लक्ष लागले आहे.

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या पुढाकारातून उपक्रम; इंडिगोच्या सीएसआर कार्यक्रमातून मार्गदर्शन

**जालना - प्रतिनिधी**

आकाशात झेप घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या जालन्यातील मुलींना व्यावसायिक वैमानिक (कमर्शियल पायलट) होण्याची दिशा मिळाली. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या 'गिव्हिंग विंग्ज टू फ्लाय' या विशेष कार्यशाळेला जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमधील २५० हून अधिक विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. इंडिगोच्या सीएसआर उपक्रमांतर्गत भारत केअर्सच्या माध्यमातून हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात झालेल्या या कार्यशाळेत विमान वाहतूक क्षेत्रातील करिअरच्या संधी, कमर्शियल पायलट होण्यासाठीची पात्रता, प्रशिक्षण आणि निवड प्रक्रियेबाबत विद्यार्थिनींना माहिती देण्यात आली. कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया आणि अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या उपस्थितीत झाले. पारंपरिक करिअरच्या पर्यायांबरोबरच विमान वाहतूक क्षेत्रातील संधींचा विचार करण्याचे आवाहन यावेळी विद्यार्थिनींना करण्यात आले. भारत केअर्सचे कार्यक्रम समन्वयक कल्पेश मोहोद आणि मास्टर ट्रेनर रुपेश गाडेकर यांनी विद्यार्थिनींना कमर्शियल पायलट होण्यासाठी आवश्यक पात्रता, निवड प्रक्रिया, प्रशिक्षण तसेच भविष्यातील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी पायलट प्रशिक्षण, अभ्यासक्रम, पात्रता आणि विमान वाहतूक क्षेत्रातील करिअरविषयी विविध प्रश्न विचारले. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रामुळे विद्यार्थिनींच्या शंकांचे निरसन झाले. जालन्यातील बारवाले महाविद्यालयाच्या कॅप्टन गार्गी गिरी यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधला. नुकतेच दक्षिण आफ्रिकेत कमर्शियल पायलट प्रशिक्षण पूर्ण केलेल्या गिरी यांनी पायलट होण्याचा स्वतःचा प्रवास, प्रशिक्षणादरम्यान आलेल्या अडचणी आणि त्यासाठी केलेल्या मेहनतीची माहिती दिली. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने महत्त्वाची भूमिका होती. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) बाळासाहेब खरात, शिक्षण विस्तार अधिकारी विनया वडजे, समन्वयक सुनील ढाकरके आणि तंत्रस्नेही सोरटी यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले. कलेक्टर थिंक टँक फेलो सुप्रविण पाखरे, मुख्यमंत्री फेलो सिमरन जैस्वाल आणि मुख्यमंत्री फेलो तनया सावंत यांनीही आयोजन व समन्वयासाठी सहकार्य केले. कार्यशाळेला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता 'गिव्हिंग विंग्ज टू फ्लाय'च्या दुसऱ्या बॅचसाठी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत नोंदणी सुरू आहे. पात्र विद्यार्थिनींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जालना जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.




मानाचा गणपती श्री नवयुवक गणेश मंडळ येथे माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी भेट दिली असता मंडळाच्या वतीने त्यांचे शाल श्रीफळ व पुष्पहार द्वारे सत्कार करण्यात आला यावेळी गणपती ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र आबड मंडळ, समितीचे अध्यक्ष अल्केश अग्रवाल, महामंत्री दर्शीत आबड, उपाध्यक्ष धीरज धारिवाल, कार्याध्यक्ष अनुराग अग्रवाल संजय तालुका राहुल तालुका मयूर साहूजी रमेश दलाल सुनील अग्रवाल जित्तू तालुका श्रेणिक आबड सुनील भुतिया हितेंद्र आवड कृष्णा देवी दान आदी दिसत आहे (छायाचित्र जावेद तांबोली )

# मत्स्योदरी तंत्रनिकेतनमध्ये अभियंता दिनानिमित्त प्रश्नमंजुषा व तांत्रिक पोस्टर स्पर्धेचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या तंत्रनिकेतन मध्ये अभियंता दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा व तांत्रिक पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक ज्ञान, सर्जनशीलता, नाविन्यपूर्ण विचार, सामान्य ज्ञान तसेच अभियांत्रिकी क्षेत्रातील विविध संकल्पनांची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्रश्नमंजुषा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध तांत्रिक व अभियांत्रिकी विषयांवरील प्रश्नांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच तांत्रिक पोस्टर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेला व



सर्जनशीलतेला वाव देत विविध तांत्रिक विषयांवर आकर्षक व माहितीपूर्ण पोस्टर्स सादर केले. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार यांच्या हस्ते करण्यात आले. प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रथम क्रमांक कु.रुपाली भारस्कर, द्वितीय क्रमांक कु.साधना बोराडे तर तृतीय क्रमांक कु.रंजना इंगळे यांनी पटकावला. तांत्रिक पोस्टर स्पर्धेत प्रथम क्रमांक कु.अनुष्का तुपे व कु.मंदाकिनी आनंदे, द्वितीय क्रमांक शुभम गवारे व विराज जाधव, तर तृतीय क्रमांक तुषार निकम व सागर शिंदे यांनी मिळविला. विजेत्यांना रोख पारितोषिक व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी पॉलिटेक्निकचे प्रभारी प्रा.अविनाश दवणे तसेच विभागप्रमुख प्रा.गोविंद बागल, प्रा.रोहित कडोस, प्रा.पवन भाग्यवंत, प्रा.प्रवीण भाकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. बाळू मिसाळ, प्रा. गायत्री गजरे, प्रा. नंदिनी खरटमल, प्रा. नंदिता कासार तसेच महाविद्यालयातील कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी सर्व विजेत्या तसेच स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशा विविध तांत्रिक व नाविन्यपूर्ण उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, अशा शुभेच्छा देण्यात आल्या.

# सायन्स सेंटरसाठी मनपाच्या माध्यमातून जागा उपलब्ध करून देऊ-अंजली शर्मा

## जालना एज्युकेशन फाउंडेशन संचलित विज्ञान शोधवाटिकेत 'नूतन विज्ञान वाचनालय'चा थाटात शुभारंभ

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरात एक मोठे सायन्स सेंटर व्हावे, ही सर्वांची मागणी लक्षात घेता महानगरपालिका प्रशासनाकडून या प्रकल्पासाठी आवश्यक ती जमीन उपलब्ध करून देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. त्यासाठी एक परिपूर्ण प्रकल्प अहवाल सादर करावा; डिसेंबरपूर्वी कायदेशीर बाबी तपासून मनपातर्फे सायन्स सेंटरसाठी हक्काची जागा मंजूर करण्याचा पूर्ण प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा यांनी दिली.




विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा आणि त्यांच्यातील कल्पकता व संशोधक वृत्तीला योग्य दिशा मिळावी, या उद्देशाने जालना एज्युकेशन फाउंडेशन संचलित क्रिस्टल बिझनेस सेंटर येथील 'विज्ञान शोधवाटिका' येथे 'नूतन विज्ञान वाचनालयाचे उद्घाटन समस्त महाजन ट्रस्टच्या (पान २ वर)

### मुक्त शिक्षण पद्धती आणि वैचारिक अधिष्ठान काळाची गरज-डॉ. नाईक

प्रमुख वक्ते डॉ. रामेश्वर नाईक यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, विज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा केवळ शब्दार्थापुरता मर्यादित न राहता त्यातील भावार्थ आणि श्रद्धेने समजून घेणे गरजेचे आहे. केवळ साधनांपेक्षा वैचारिक बैठक (अधिष्ठान) आणि सकारात्मकरित्या बदल घडवणारे शिक्षण हीच काळाची खरी गरज आहे. पारंपरिक शिक्षण व्यवस्थेच्या चौकटीबाहेर जाऊन आज मुलांना 'मुक्त शिक्षण पद्धती' आणि प्रात्यक्षिक विज्ञानाची जोड देणे आवश्यक झाले आहे, असे विचार त्यांनी मांडले.

# राहत सोशल ग्रुप जालनातर्फे आयोजित मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्याचे भिंती पत्रकाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या हस्ते विमोचन

**जालना - प्रतिनिधी**

राहत सोशल ग्रुप जालना गेल्या २५ वर्षांपासून यशस्वीपणे मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करत आहे. यावर्षीही, रविवार, २९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता, राहत सोशल ग्रुप जालनातर्फे आयेशा लान्स उर्दू हायस्कूल पाठी मागे, कदिम जालना येथे मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन केले जात आहे. यावर्षीच्या मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्यांच्या प्रचारासाठीचे वॉल पोस्टर आज सायंकाळी ७ वाजता मगरीबच्या नमाजानंतर, जालनाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या हस्ते अंबड रोड, जालना येथील संपर्क



कार्यालयात विमोचन करण्यात आले. याप्रसंगी जालनाचे खासदार डॉ. कल्याण काळे, राहत सोशल ग्रुप जालनाचे अध्यक्ष शेख अफसर शेख जी, लियाकत अली खान यासिर जालनावी, संस्थापक सचिव, शेख सलीम शेख मुहम्मद, काँग्रेस अल्पसंख्याक सेलचे प्रदेश उपाध्यक्ष बदर चाऊस, काँग्रेस जिल्हाध्यक्ष कल्याण दले, शहर अध्यक्ष डॉ. विशाल धनोरे, अब्दुल रऊफ परसु वाले, कलीम खान आणि इतर उपस्थित होते. या प्रसंगी, खासदार डॉ. कल्याण काळे यांनी आवाहन केले आहे की, ज्यांना आपल्या मुलामुलींचे लग्न राहत सोशल ग्रुप जालना अंतर्गत मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्यात करायचे आहे, त्यांनी १५ नोव्हेंबरपूर्वी राहत सोशल ग्रुप जालनाचे पदाधिकारी शेख अफसर शेख जी, लियाकत अली खान यासिर जालनावी, शेख सलीम शेख मुहम्मद आणि इतर पदाधिकारयांशी संपर्क साधावा. हे लक्षात घ्यावे की, राहत सोशल ग्रुप जालना गेल्या २५ वर्षांपासून जालना शहरात यशस्वीपणे मुस्लिम सामूहिक विवाह सोहळे आयोजित करत आहे, जे कौतुकास्पद आहे आणि आतापर्यंत या मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्यांच्या माध्यमातून सहाशेहून अधिक मुस्लिम जोडप्यांचे विवाह झाले आहेत. या मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्यांमध्ये नोंदणीसाठी, मुलाचे वय २१ वर्षे आणि मुलीचे वय १८ वर्षे असल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे, त्यामुळे सर्व इच्छुक पालकांना (पान २ वर)

# आष्टी येथे सावली महिला प्रभाग संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

## उपजीविका वृद्धी, उद्योगवाढ व महिला सक्षमीकरणासाठी विविध महत्त्वपूर्ण ठराव मंजूर

**आष्टी - प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया यांच्या नेतृत्वाखाली, प्रकल्प संचालक सुनीलकुमार पठारे व जिल्हा अभियान व्यवस्थापक शैलेश चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच गट विकास अधिकारी कौशल कुमार पाटील , ग्राम विकास अधिकारी डी बी काळे यांच्या उपस्थितीत आष्टी येथे **सावली महिला प्रभाग संघ, आष्टी यांची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. यावेळी प्रभाग संघाच्या वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. महिला बचत गटांच्या माध्यमातून उपजीविका वृद्धी, उद्योग-व्यवसायाला चालना, आर्थिक स्वावलंबन आणि



महिला सक्षमीकरण यासाठी विविध महत्त्वपूर्ण ठराव मांडून मंजूर करण्यात आले.

अभियानांतर्गत उपलब्ध होणाऱ्या आर्थिक स्रोतांचा योग्य उपयोग करून प्रभागातील प्रत्येक कुटुंबाने उपजीविका वृद्धीसाठी किमान दहा कोंबड्या व दोन शेळ्यांचे पालन व्यवसाय करणे तसेच किमान एका उत्पादक गटामध्ये सहभागी होणे. आवश्यक करण्यात आले आहे. अभियानाच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य व मार्गदर्शनातून उभारण्यात आलेल्या प्रत्येक उद्योग-व्यवसायाची माहिती सर्वांना दिसेल अशा ठिकाणी **माहिती फलक लावण्यात येणार आहे. या फलकावर उमेद अभियानातील त्रिस्तरीय संस्थेची, उद्योग संचालकाची तसेच संबंधित उद्योगाची माहिती नमूद करण्यात येणार आहे.

पशुसखी, कृषिसखी, बँकसखी, ग्रामसखी व सीएलएफ मॅनेजर यांच्या कामकाजात शिस्त व नियमितता आणण्यासाठीही निर्णय घेण्यात आले. संबंधितांनी कामाच्या ठिकाणी जीपीएस फोटो सादर करणे बंधनकारक करण्यात आले असून जीपीएस फोटो उपलब्ध नसल्यास त्या दिवसाची उपस्थिती ग्राह्य धरली जाणार नाही, असा ठराव करण्यात आला. तालुका बैठक, प्रभाग (पान २ वर)

# शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत द्या; धर्मवीर छावा संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील शेतकरी सध्या गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत असून, अतिवृष्टी, पिकांचे नुकसान आणि वाढत्या शेतीखर्चामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट झाली आहे. या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ₹५०,००० आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी धर्मवीर छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. निवेदनात शेतकऱ्यांना पीक नुकसानभरपाई तातडीने



मिळावी, कर्जमाफीबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, पिकविम्याची रक्कम तातडीने मिळावी, शेतकऱ्यांच्या कर्जावरील वसुलीला तात्पुरती स्थगिती द्यावी, तसेच आवश्यक कृषी निविष्ठा व इतर शासकीय मदत उपलब्ध करून द्यावी, अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे पारदर्शक पद्धतीने करून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट आर्थिक मदत जमा करावी, अशी मागणीही निवेदनातून (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.